ಕರ್ನಾಟಕ ಸರ್ಕಾರ

परिसर अध्ययन
ENVIRONMENTAL STUDIES

अभ्याससहित पाठ्यपुस्तक
TEXT CUM WORK BOOK

(REVISED) Part-2

मराठी माध्यम
MARATHI MEDIUM

2

इयत्ता दुसरी
SECOND STANDARD

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

KARNATAKA TEXT BOOK SOCIETY (R.)

6th Cross, Malleshwaram,
Bengaluru - 560 003

अनुक्रमणिका

पाठ क्रमांक	पाठ	पृष्ठ क्रमांक
10.	आम्हा सर्वांची संपत्ती	1 - 9
11.	प्रवास	10 - 18
12.	माझे कुटुंब	19 - 25
13.	सण आणि समारंभ	26 - 32
14.	वडीलधाऱ्यांची काळजी	33 - 35
15.	सहाय्य–सहकार्य	36 - 40
16.	चला खेळू	41 - 48
17.	आम्हाला हे पाहिजे	49 - 52
18.	आकाशात	53 - 62
19.	माझे गाव – सुदर गाव	63 - 70

© KTPS NOT TO BE REPUBLISHED

पाठ–10

आम्हा सर्वांची संपत्ती

Z1A2K7


या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

* सार्वजनिक संपत्तीची ओळख करून घेशील व त्यांच्या आवश्यकते विषयी वडिलधाऱ्यांकडून समजून घेशील.


चित्र बघ, येथे सुजाता उभी आहे. हे सुजाताचे घर आहे. तिची शाळा फार दूरवर आहे. सुजाता रोज आपल्या मैत्रिणीसोबत शाळेला जाते.

शाळेला जाताना ती कोठून जाते ? तिच्या सोबत जा व माहिती घे. सुजाता याबद्दल तुला सांगेल.

बाणाच्या सहाय्याने जाण्याच्या मार्गाची दिशा दाखविली आहे.




© KTBS NOT TO BE REPUBLISHED




माझ्या घरापासून शाळेला जाताना सर्वात प्रथम पोस्ट ऑफिस लागते. येथून आम्ही दुसऱ्या गावी राहणाऱ्या मित्राला, नातेवाइकांना पत्रे पाठवू शकतो.

तुझ्या गावातील पोस्ट ऑफिसला जाऊन पोस्टमनच्या कामासंबंधी माहिती समजून घे.



हे बघ पथदीप. रात्रीच्या वेळी लोकांना रस्त्याने चालताना उजेड नको का ? म्हणून हे पथदीप रस्त्याच्या कडेला ठिकठिकाणी लावले आहेत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



इथे बघ. हा सार्वजनिक नळ आहे. येथे कोणीही पाणी भरु शकतात. पाण्याचा अपव्यय टाळावा.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

हे बघ, बसस्थानक. एका गावाहून दुसऱ्या गावी जाणाऱ्या गाड्या येथे असतात. तुझ्या गावातील बसस्थानकास भेट देऊन तेथील स्वच्छतेसंबंधी समजून घे.




हे शौचालय आहे. सर्वांच्या उपयोगासाठी ठिकठिकाणी अशी शौचालये बाधली आहेत. याची आवश्यकता काय ? ते समजून घे.

सार्वजनिक ठिकाणी मलमूत्र विसर्जन करु नये. शौचालयाचा वापर करण्याची सवय ठेव.



हे गावातील स्वस्तधान्य दुकान. येथे कमीदरात तांदूळ, गहू, साखर, तेल इत्यादी वस्तू मिळतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



हे हॉस्पीटल. लोकांचे आरोग्य सांभाळण्यासाठी हॉस्पीटल पाहिजेत. तू कधी हॉस्पीटलात कोणत्या कारणासाठी गेला आहेस का ? कशासाठी ? सांग.



उद्यानापासून पुढे गेल्यास माझी शाळा आहे. या उद्यानात अनेक प्रकारची झाडे, रोप, वेली आहेत. पक्षी, फुलपाखरे उडत आहेत. बसण्यासाठी बाक आहेत. हे एक सुंदर उद्यान आहे.



ही माझी शाळा. ती फार मोठी आहे. येथे आठ वर्ग खोल्या आहेत. शाळेच्या उजव्या बाजूला खेळाचे मैदान आहे. मी व माझे मित्र मिळून स्वच्छ करतो. माझी शाळा मला फार आवडते.

तुझ्या शाळेबद्दल दोन वाक्यात माहिती सांग.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED


सुजाताच्या घरापासून शाळेला जाताना तू काय काय पाहिलसं ? खालील रकान्यात लिही.

क्र. सं.	पाहिलेले ठिकाण	हे तुझ्या गावात आहे का ? असल्यास (✓) कर	हे तुझ्या गावात नसल्यास (X) कर
1			
2			
3			
4			
5			
6			
7			
8			
9			
10			

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

लोकांच्या उपयोगासाठी गावात शाळा, पोस्ट ऑफिस, हॉस्पीटल, स्वस्त धान्य दुकान, शौचालय, बसस्थानक, पथदीप, सार्वजानिक नळ असतात. यामुळे आमच्या गरजा पूर्ण होतात. ही आमची संपत्ती. ती सार्वजनिक संपत्ती होय.

तुझ्या गावातील सार्वजनिक संपत्ती या वर्तुळात लिही. प्रत्येकाचा उपयोग शिक्षक अथवा मोठ्यांकडून समजून घे.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

गावातील सर्वांच्या उपयोगासाठी असणारी सुविधा म्हणजेच सार्वजनिक संपत्ती. या सर्वांची आम्हाला आवश्यकता आहे. सार्वजनिक संपत्तीचे नुकसान न करता काळजीपूर्वक वापर केला पाहिजे. सार्वजनिक नळांचे व पथदिपांचे नुकसान करु नये. सार्वजनिक शौचालयात स्वच्छता राखली पाहिजे. उद्यानात कचरा करु नये.

एका वाक्यात उत्तर लिही.

1) पोस्ट कार्ड तुला कोठून मिळते ?

.....

2) तुझ्या गावातील / शहरातील हॉस्पीटलचा तुला काय उपयोग होतो ?

.....

3) गावात बस येऊन कोठे थांबते ?

.....

4) तुझी शाळा सुंदर दिसण्यासाठी तू काय काय करशील ?

.....

5) सार्वजनिक नळ का असतात ?

.....

.....

.....

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सार्वजनिक संपत्ती. आम्हा सर्वांची संपत्ती.



पाठ-11

प्रवास

F6L6K3

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

* प्रवासाच्या साधनापैकी वेगाने धावणारी आणि हळू धावणाऱ्या वाहनांचे वर्गिकरण करशील.
* जमिनीवरुन, पाण्यातून व हवाई मार्गे जाणारी वाहने ओळखशील.

* तू शाळेला कसा येतोस ?
* तुम्ही दुसऱ्या गावी जायचे असल्यास कसे जाता ?

एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी लोकांना व सामान नेण्यासाठी वापरले जाणारे साधन म्हणजे 'वाहन'


तू पाहिलेल्या वाहनांची नावे लिही.


1) .....
2) .....
3) .....
4) .....
5) .....
6) .....
7) .....
8) .....


@KTBS NOT TO BE REPUBLISHED


चित्रातील वाहनांची नावे दिलेल्या चौकानात लिही.


























@KTBS NOT TO BE REPUBLISHED

चित्रातील कोणती वाहने सावकाश, कोणती वाहने वेगाने जातात त्या रकान्यात (✓) अशी खूण कर.


अ.नं.	वाहनाचे नाव	सावकाश जाणारे	वेगाने जाणारे
1	सायकल		
2	बैलगाडी		
3	बस		
4	रेल्वे		
5	विमान		
6	ट्रक		
7	घोडागाडी		
8	मोटार सायकल		
9	ऑटोरिक्षा		
10	जहाज		


@KTBS NOT TO BE REPUBLISHED






रहिमचे गाव कारवार. त्याच्या आजोबाचे घर उडुपीमध्ये आहे. रहिम आपल्या आजोबांच्या गावी जात आहे. खालील वाहनांपैकी कोणत्या वाहनाचा वापर करुन रहिम लवकर पोहचेल, त्या वाहनासमोर (✓) अशी खूण कर.











प्रिया शिवमोग्याहून आपल्या आजीच्या गावी तुमकूरला कोणत्या वाहनाने जाणे योग्य होईल ? त्या वाहनासमोर (✓) अशी खूण कर.






@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कलबुरगि शहरात रमेश व जॉन शेजारी शेजारी राहतात. ते दोघं एकाच कार्यालयात काम करतात. रमेश सायकल वरुन व जॉन मोटार सायकल वरुन जातात. आपल्या आपल्या वाहनातून एकाच वेळी ऑफिसला जाण्यास निघतात.

यामध्ये कोण ऑफिसला लवकर जातो. दिलेल्या चौकोनात (✓) अशी खूण करा.



उत्तर दे.

* जमिनीवरुन धावणाऱ्या कोणत्याही चार वाहनांची नावे लिही.

....

....

* पाण्यावरुन जाणारी वाहने पाहिलंस का ? त्यांची नावे लिही त्यातून तू प्रवास केला आहेस का ?

....

....

* हवेतून जाणाऱ्या वाहनांबद्दल तुला माहिती आहे का ? एका वाहनाचे नाव सांग.

.....

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

येथे काही वाहनांची नावे दिली आहेत. ती कोठे चालतात ते खालील तक्त्यात लिही.

ट्रक, बस, सायकल, विमान, कार, बैलगाडी, नाव, हेलीकॉप्टर, घोडागाडी, मोटारसायकल, जहाज, होडी.


जमिनीवरुन जाणारी वाहने	पाण्यावरुन जाणारी वाहने	हवेतून जाणारी वाहने

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

* जमिनीवरुन होणाऱ्या वाहतुकीला 'भूसंचार' म्हणतात.
* पाण्यावरुन होणाऱ्या वाहतूकीला 'जलसंचार' म्हणतात.
* हवेतून होणाऱ्या वाहतूकीला 'अवकाश संचार' म्हणतात.

कृती :


खाली दिलेले ठिपके जोड, रंग भर, हे कोणते वाहन आहे ओळख.




©KTBS
NOT TO BE REPUBLISHED


खाली एका बाजूला वाहने व दुसऱ्या बाजूला त्याचे उपयोग दिले आहेत. रेषा ओढून जोड्या जुळव.






















@KTBS NOT TO BE REPUBLISHED

वरील चित्रात काही वाहने दाखविली आहेत. यापैकी फक्त लोक प्रवास करतात त्यासमोर O अशी खूण कर. फक्त सामान नेण्यासाठी वापरतात त्या वाहनासमोर ☐ अशी खूण कर व दोन्हीच्या वापरासाठी असलेल्या वाहनासमोर Δ अशी खूण कर.

कृत्ती :


* रिकाम्या काडीपेट्यांची जोडून आगगाडी तयार कर.
* कागदाचे विमान बनवून घरात उडव.

मी कोण ? सांग

मी उडतो पण पक्षी नव्हे
चमकतो पण तारा नव्हे
मला चाक आहेत पण कार नव्हे
वेगवान आहे पण चित्ता नव्हे
तर मी कोण ?



माझा खास आहे मार्ग
पाणी नसे माझा मार्ग
वेग माझा असतो अती
आवाजात आहे माझ्या गती
तर मी कोण ?



पाण्यात मी छान खेळते
रस्त्यांची मला गरज नसते
लहान मोठ्यांना माझ्यात
बसण्यास आवडते
तर मी कोण ?



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 12

माझे कुटुंब

D1G5A6

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

* कुटुंबात असलेली वैविधता ओळखशील.
* कुटुंब ही एक आधार व्यवस्था याची जाणीव करुन घेशील.
* आम्ही दुसऱ्या प्रमाणेच आहोत, तरीसुध्दा वेगळे आहोत हे समजून घेशील.

खालील चित्रे बघ. प्रत्येक कुटुंबात असलेल्या सदस्यांची संख्या मोजून लिही.

अ.नं.	कुटुंबाचे चित्र	कुटुंबातील सदस्य संख्या
कुटुंब 1		
कुटुंब 2		
कुटुंब 3		


© BOKTBS NOT TO BE REPUBLISHED

कुटुंब 4		

* कोणत्या कुटुंबामध्ये सर्वात कमी लोक आहेत ?
* सर्वात जास्त लोक असणारे कुटुंब कोणते ?
* तुझ्या कुटुंबात किती सदस्य आहेत ते सांग.

येथील चित्रामधील जास्त सदस्य असणाऱ्या कुटुंबाच्या चित्राला (✓)अशी खूण कर.





रिकाम्या जागी लिही



कमी सदस्य असणाऱ्या कुटुंबाला लहान कुटुंब म्हणतात. जास्त सदस्य असणाऱ्या कुटुंबाला मोठे कुटुंब म्हणतात.

NOT TO BE REPUBLISHED

विमलाच्या कुटुंबात सहा सदस्य आहेत. आजोबा, आजी, आई, बाबा, भाऊ आणि विमल.



विमलच्या कुटुंबाच्या चित्राचे निरीक्षण कर. येथे काय चालले आहे ते सांग तुझ्या घरात तुला कामात कोण मदत करतात ? सांग.

कुटुंबातील सदस्य आमचा अभ्यास, खेळ तसेच इतर कामात मदत करतात. कुटुंबातील सदस्यांची आम्हा सर्वांना आवश्यकता आहे.

© KTB PUBLISHED NOT TO BE REPUBLISHED

चित्रांचे निरीक्षण कर.




विमल आपल्या शेजारी असलेल्या राधाच्या घरी जात आहे.



उत्तरे सांग.

* विमल काय करत आहे ?
* तिला कोण मदत करत आहे ?
* तू शेजाऱ्यांना मदत करतोस का ?

शेजाऱ्यांना मदत करण्याची सवय लावून घे.



वरील चित्रांचे निरीक्षण कर. दिलेल्या गोलात सांगितल्याप्रमाणे रंग भर.

* जाड असणारी व्यक्ती – लाल रंग
* कुरळे केस असणारी व्यक्ती – काळा रंग
* उंच व्यक्ती – निळा रंग
* ठेंगू व्यक्ती – हिरवा रंग
* लांब केस असलेल्या व्यक्ती – निळा रंग


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुझ्या मित्र / मैत्रिणीमध्ये असलेली वैशिष्टे खाली दिलेल्या तक्यात लिही.

मित्र / मैत्रिणीचे नाव	रंग	उंची उंच-ठेंगू	जाड-बारीक	केस कुरळे/सरळ	केस लांब/कमी

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुझी व तुझ्या मित्र / मैत्रिणींची - वैशिष्टे जाणून घे. फरक ओळख. मित्र मैत्रिणीं सोबत चर्चा कर.



चित्रात जानकी, फरिदा, सलीम, जॉन, रमेश सर्वजण लगोरी खेळत आहेत. सर्वजण वेगवेगळे दिसत आहेत. सर्वजण मिळून शाळेला येतात. सर्वजण गणवेश घालून येतात. सर्वजण मिळून अभ्यास करतात. सर्वजण मित्रत्वाने राहतात. एकमेकांना मदत करतात.

तुम्ही मित्र मैत्रिणी वेगवेगळे दिसता का ? तुम्ही मित्रा बरोबर खेळता, अभ्यास करता का ? एकमेकांना मदत करता का ?

गा आणि आनंद लुटा

मी मोठा तू छोटा
रंग आमचे वेगवेगळे
शाळेमध्ये शिकताना
एकत्र राहू आपण सगळे

डोळ्यांचा रंग वेगळा
केसांचा रंग वेगळा
दोन्ही बाजूस दोन कान
कोणाचे नाक छान

आम्ही सर्व मित्र मैत्रिणी
खेळू नाचू गाऊ गाणी

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ – 13

सण आणि समारंभ

V7C1D8


या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

* आपल्या कुटुंबातील / नातेवाईकांच्या कुटुंबातील समारंभात भाग घेतल्याबद्दल अहवाल सादर करशील.

खालील चित्रे बघ. या समारंभाची नावे चित्राखाली दिलेल्या चौकटीत लिही.







© RSTB NOT TO BE REPUBLISHED

रिताच्या वाढदिवसाची चित्रे बघून गोष्ट सांग.



© BALBHARATI PUBLICATIONS
NOT TO BE REPUBLISHED


उत्तरे सांग.

* तुझ्या घरात कोणते कार्यक्रम होतात. ते सांग.
* तुझ्या घरात कोणकोणते सण साजरे करता ?
* तुझ्या घरात साजरे करणाऱ्या कोणत्याही एका समारंभाचे किंवा सणाचे वर्णन दोन वाक्यात सांग ?
* तू तुझ्या मित्राच्या अथवा नातेवाईकांच्या घरात साजऱ्या झालेल्या समारंभाला गेलास होतास का ?
* अशा कार्यक्रमांची नावे सांग.

खालील चित्रांचे निरीक्षण कर. हे सण कोणते हे तुला माहीत आहे का ? दिलेल्या जागेत त्यांची नावे लिही.







© KTBS NOT TO BE REPUBLISHED

दिव्यांचा सण म्हणजेच दिवाळी होय. हिंदू लोक हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करतात. घरातील सर्वजण नवीन कपडे परिधान करतात. वेगवेगळे गोड पदार्थ तयार करुन खातात. घरामध्ये दिवे लावतात. प्रदूषणरहित फटाके उडवितात.





ईद-उल-फित्र रमजान महिन्याच्या शेवटी आचरण करतात. रमजान हा मुसलमानांचा प्रमुख सण. हा सण एक महिन्याच्या उपवासानंतर साजरा करतात. घरातील सर्वजण गोड पदार्थ वाटून शुभेच्छा देतात.


येशु ख्रिस्ताचा जन्म दिवस ' ख्रिसमस' म्हणून साजरा करतात. ख्रिश्चन लोक हा सण 25 डिसेंबर या दिवशी मोठ्या उत्साहाने, आनंदाने साजरा करतात. त्यादिवशी सर्वजण नवीन कपडे परिधान करुन केक वाटप करुन सर्वांना मेरी ख्रिसमस म्हणून शुभेच्छा देतात.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED


खालील चित्रांचे निरीक्षण कर. या समारंभामध्ये तू भाग घेतला असशील तर (✓) अशी खूण कर.





खालील चित्रे बघ व त्या सणांची नावे लिही.








@KTBS NOT TO BE REPUBLISHED





चित्रे बघ समारंभाचे नाव लिही.




तुझ्या शाळेत साजरे करणारे सण / समारंभाची नावे सांग. तू, तुझे मित्र शाळेतील या समारंभामध्ये कसे सहभागी होता ?

तुला आवडत असलेल्या शाळेतील एका समारंभाचे वर्णन सांग.




NOT TO BE REPUBLISHED

चित्रांना रंग भर.







NOT TO BE REPUBLISHED © KSTB

वेगवेगळ्या प्रकारच्या रांगोळी काढण्यास शिक. मोठी माणसे रांगोळी काढताना त्याचे निरीक्षण कर.

तुझ्या घरात साजरे करणारे सण अथवा समारंभाना तुझ्या घरातील सदस्य घर कसे सजवतात याचे निरीक्षण कर व शिकून घे.

पाठ –14

वडीलधाऱ्यांची काळजी

Y6H8J7

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,


* रोगी, आजारी तसेच वयस्करांना मदत करण्याची, तसेच त्यांना सहाय्य करण्याची मनोभावना तुझ्यात वाढीस लागेल.



उत्तरे सांग.


* आजी का झोपली होती ?
* राजूने आजीला कशी मदत केली ?
* तू वडील, आई, आजोबा, आजीला कशी मदत करतोस ?

चित्रे बघ, हे काय करत आहेत सांग.








या चित्रांचे निरीक्षण कर. योग्य चित्रांना (✓) अशी खूण कर. चुकीच्या चित्रावर (x) अशी खूण कर.














@KTBS NOT TO BE REPUBLISHED

खालील चित्रांचे निरीक्षण कर. तू अशा प्रसंगी काय करशील ते सांग.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

गा आणि आनंद लुटा

आजोबांना करु सहकार

आजऱ्यांना हवा उपचार

नाते जोडून प्रेमाचे

शिक तू करण्यास उपकार

आम्ही मोठ्यांचा आदर केला पाहिजे. वयस्करांची, आजारी व्यक्तिंची प्रेमाने काळजी घेतली पाहिजे.

पाठ –15

सहाय्य – सहकार्य

P3A5Y2

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

* घरात कोण कोण काय काय काम करतात ? हे जाणून घेशील.

हे रामचे घर, रामच्या घरातील लोक करतात त्या कामाचे निरीक्षण कर.



कोण कोणते काम करत आहे ? दिलेल्या जागी लिही.

* बागेला पाणी घालत आहे. _____
* फुले तोडत आहे. _____
* केस विंचरत आहे. _____
* पुस्तके व्यवस्थित ठेवत आहे. _____

तुझ्या घरात सकाळपासून संध्याकाळपर्यंत कोणकोणती कामे करतात आठवण कर. कुटुंबातील प्रत्येक सदस्याने केलेले काम सांग.

हे ममताचे घर. तिचे वडील, आई, भाऊ आणि ती येथे राहतात. खालील चित्रात तिच्या घरात केली जाणारी कामे दाखविलेली आहेत.





NOT TO BE REPUBLISHED

उत्तरे दे :


* ममताच्या घरात कोणकोणती कामे करत आहेत ? सांग.
* ही कामे कोण करत आहे ?
* ही सगळी कामे एकट्याने केल्यास काय होईल ? विचार कर.
* तुझ्या घरात सर्वजण मिळून कोणकोणती कामे करता ?
* अशाप्रकारे काम करणे कसे उपयुक्त आहे ? सांग.

घरात तू करतोस त्या कामासमोर (✓) अशी खूण कर.

























तुला घरात कोणते काम करायला आवडते ? सांग.


@KTPS NOT TO BE REPUBLISHED


खालील चित्रांच्या जोड्या जुळव.



















@KTBS NOT TO BE REPUBLISHED

खालील कामे करत असल्याचा अभिनय कर.

* विहीरीतून पाणी ओढणे.
* लाकूड तोडणे.
* कपडे धुणे.
* भाजीपाला कापणे.
* झाडांना पाणी घालणे.
* भांडी धुणे.
* कचरा काढणे.
* केस विंचरणे.

गा आणि आनंद लुटा

घर माझे सुंदर
दिसते किती मनोहर
काम करु आनंदाने
मिळूनी सारे गाऊ गाणे
स्वच्छ ठेवू घरदार
निर्मल राहिल परिसर

@KTDS NOT TO BE REPUBLISHED

पाठ –16

चला खेळू


T1N7Z1

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

* घरात व घराबाहेर खेळावयाच्या खेळांची यादी करशील.

खालील चित्रांचे निरीक्षण कर. घरात व शाळेत खेळावयाच्या खेळासमोर (✓) अशी खूण कर.





मित्रमैत्रिणींबरोबर मिळून कोणकोणते खेळ खेळता अशा पाच खेळांची नावे लिही.

.....

.....


.....

.....

.....

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

खालील चित्रांचे निरीक्षण कर. हे खेळ कोठे खेळतात ? त्याखाली दिलेल्या चौकोनात (✓) अशी खूण कर.



आत/बाहेर



आत/बाहेर



आत/बाहेर



आत/बाहेर

@KTB NOT TO BE REPUBLISHED

खाली काही खेळांची यादी दिली आहे. त्यापैकी काही आत किंवा काही बाहेर खेळतात. बाहेर व आत खेळावयाच्या खेळासमोर त्या त्या रकान्यात (✓) अशी खूण कर.

खेळ	आत	बाहेर
सारीपाट		
कॅरम		
लंगडी		
लगोरी		


क्रिकेट		
रस्सीखेच		
कब्बडी		
सारिपाट		
साप शिडी		
भोवरा		
हॉलीबॉल		
थ्रो बॉल		


@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

शाळेच्या अथवा घराच्या आत खेळल्या जाणाऱ्या खेळांना अंतरांगण खेळ (इन्डोअरगेम्स) म्हणतात.

शाळेच्या अथवा घराच्या बाहेर (खेळाच्या मैदानावर) खेळल्या जाणाऱ्या खेळांना 'मैदानी किंवा बाह्यांगण खेळ म्हणतात.

या खेळांचे निरीक्षण कर. त्या खालील चौकोनात अंतरांगण खेळासाठी ☐ व मैदानी खेळांसाठी △ अशी खूण कर.













NOT TO BE REPUBLISHED @KTBS

खालील खेळ खेळण्यासाठी कोणते साहित्य वापरतात. ते दिलेल्या जागी लिही.


कब्बडी	.....	.....	.....
क्रिकेट	.....	.....	.....
फुटबॉल	.....	.....	.....
लगोरी	.....	.....	.....
व्हॉलीबॉल	.....	.....	.....
सापशिडी	.....	.....	.....
लपंडाव	.....	.....	.....
सारीपाठ	.....	.....	.....
छप्प्याचा खेळ	.....	.....	.....
गोटयांचा खेळ	.....	.....	.....


शाळेच्या आत आणि शाळेच्या बाहेर खेळावयाच्या खेळांची चित्रे संग्रह कर. खालील जागेत चिकटव.

शाळेच्या आत	शाळेच्या बाहेर

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ठिपके जोडून रेखा चित्र तयार कर व रंगव.





@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

गा आणि आनंद लुटा

चला चला रे खेळूया खेळूया
विविध खेळ खेळूया
लगोरी, खो-खो, कब्बडी
क्रिकेट, फुटबॉल, सापशिडी
ऐकताच नावे मारतो उडी
चला चला रे खेळूया

क्रिकेट, कब्बडी मैदानात
चेस, कॅरम खेळू घरात
भोवरा फिरतो गर गर गर
खेळायला जाऊ भर भर भर
चला चला रे खेळूया

गोट्यांचा खेळ रंगतो छान
छप्पा पाणी खेळ तो छान
मित्र मैत्रिंणी सारे जमून
खेळ खेळत जाऊ रमून
चला चला रे खेळूया

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ –17

आम्हाला हे पाहिजे

G5U1F3

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,


* तुम्हाला तुमच्या गरजांची जाणीव होईल.

ही चित्रे बघून तूला काय समजले ?



आई , मी शिकण्यासाठी शाळेला चाललेय.





घरात भाजीपाला नाही. मी बाजारात चाललेय.






घरात तांदूळ, गहू पाहिजेत ते आणायला मी दुकानात जातोय.





मला थंडी वाजत आहे. औषध आणण्यासाठी दवाखान्यात जाते.



© BTBS NOT TO BE REPUBLISHED



मला शहरात जायचं आहे. मला बसथांब्यावर गेलं पाहिजे.



शाळा, बाजार, दवाखाना, दुकान, बसथांबा,
पोस्ट ऑफिस यामध्ये आपल्या गरजेच्या वस्तू मिळतात.


ही चित्रे बघ. यापैकी तुझ्या गावात काय काय आहे ? त्या चित्राखालील चौकोनात (✓) अशी खूण कर.



हे तुला का पाहिजे ? सांग.

NOT TO BE REPUBLISHED

रेषा ओढून चित्र जुळव























@KTBS NOT TO BE REPUBLISHED

गा आणि आनंद लुटा

अक्षर शिकायला

खेळ खेळायला

शाळेत जायला, हवे आता हो हवे आता

दुर दुर असलेल्या

गावांना जायला

बसमधून जायला हवे आता हो हवे आता

तऱ्हे तऱ्हेच्या भाज्या छान

आणाया खाऊ, फळे आणि धान्य

बाजारात जायला, हवे आता हो हवे आता

आजारी पडले, जखम झाली

औषध आणण्या

दवाखान्यात जायला, हवे आता हो हवे आता

शाळा , बस, बाजार

दवाखाना, रस्ते आणि घर

मिळून साऱ्यांनी राखायला, हवे आता हो हवे आता.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

हे सर्व आम्हाला हवे.



NOT FOR SALE REPUBLISH


पाठ –18

आकाशात

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

* सूर्य, चंद्र, ताऱ्यांचे निरीक्षण करुन त्याची लक्षणे ओळखशील.
* पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर दिशा ओळखशील.


खालील चित्राचे निरीक्षण कर . आता कोणती वेळ आहे ? सांग.





@KTBS NOT TO BE REPUBLISHED

दिवसा तुला आकाशात काय दिसते ?


मुलांनो, मी सूर्य आहे. मी
दिवसा तुम्हाला
दिसतो. मी तुम्हा सर्वांना प्रकाश देतो.









© KTBS NOT TO BE REPUBLISHED



माझ्या उदयाची व अस्ताची दिशा कोणती ?
तुला माहीत आहे का ?
हे चित्र बघ. पूर्व दिशेला माझा उदय होतो.
रेहना माझ्या समोर थांबून मी उदय होताना
पहात आहे.






© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

रेहनाने पश्चिम दिशेला पाठ केलेली आहे. मी पश्चिम दिशेला मावळतो.





आता रेहनाने आपला डावा हात झाडाकडे केला आहे . ही उत्तर दिशा.






© KTBS NOT TO BE REPUBLISHED




रेहना आता आपला उजवा हात घराकडे दाखवत आहे, ती दक्षिण दिशा होय.





मुला, मी उगवतो त्या दिशेकडे तोंड करुन थांबून पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर दिशा ओळख पाहू ? सोपं आहे ना ?

पवन चित्रामध्ये पूर्वेकडे तोंड करुन उभा आहे. चित्राचे निरीक्षण कर. पुढील वाक्ये पूर्ण कर.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

* नारळाचे झाड पवनच्या ..... दिशेला आहे.
* कुत्रा .....दिशेला आहे.
* दक्षिण दिशेला ..... आहे.

खेळा व समजून घ्या.


मित्र मैत्रिणीबरोबर मैदानात चला. सुर्याच्या समोर थांबा. इतर तीन दिशा ओळखण्याचा खेळ खेळा. दिशा बरोबर ओळखणारा विजेता.



वरील चित्र बघ. दिवसा सामान्यपणे दिसणारे काही प्रसग आहेत. शिक्षकाच्या किंवा मोठ्यांच्या मदतीने ते प्रसंग कोणते ते दिलेल्या चौकोनात लिही.

दिवसा तू कोणकोणती कामे करतोस ? त्या बद्दल मित्राबरोबर चर्चा कर.


सुर्याच्या प्रखर प्रकाशाकडे उघड्या डोळ्यांनी पाहू नको. सुर्याला पाहण्यासाठी खास प्रकारचे चष्मे असतात. शिक्षकांची किंवा मोठ्यांची मदत घेऊन बघ.



आता माझा अस्त होण्याची वेळ आली. आता अंधार होईल. मुलांनो आता आकाशात बघा.



तुला रात्री काय दिसते ? येथे लिही. ....., ...



मी चंद्र आहे. रात्री आकाशात मी दिसतो. प्रत्येक रात्री माझ्या आकारात बदल होतो नाही का ? मी पूर्ण गोलाकार दिसतो. तेव्हा असते **पौर्णिमा**.
मी अजिबात दिसत नाही. तेव्हा असते **अमावस्या**

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

असे कर.

खाली 15 चौकोन दिले आहेत. पौर्णिमेपासून अमावस्येपर्यंत प्रत्येक दिवशी माझा आकार बघ. प्रत्येक दिवशी दिसणारा माझा आकार येथे क्रमाने काढ.

पौर्णिमा, अमावस्या किती दिवसांनी येते. समजून घे.



मुलांनो, रात्री आकाशात तुम्ही
आम्हाला सुध्दा पाहिला असाल होय ना !




आम्ही तारे आहोत, रात्रीच्या
आकाशात
आम्ही चमचमतो. आम्ही किती
आहोत मोजू शकशील ?



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ठिपके जोडून रंग भर



गा आणि आनंद लुटा

सूर्य उगवला पूर्वेला पूर्वेला
उब मिळाली साऱ्यांना साऱ्यांना
पक्षी उडाले आकाशी आकाशी
छान शोभती जणू नक्षी जणू नक्षी

चांदोबा चांदोबा दिसतोस छान
साऱ्या ताऱ्यात शोभतोस छान
सुंदर, शितल, चांदणे छान
चंदेरी परिसर दिसतो छान

चमचम चांदणी आकाशी आकाशी
मंद मंद प्रकाश आम्हास देशी
तुझ्या प्रकाशात नाचूया नाचूया
गाऊया नाचूया खेळूया खेळूया

@RSTDS NOT TO BE REPUBLISHED

पाठ –19


माझे गाव – सुंदर गाव


K9C4R3


या पाठाच्या अध्ययनानंतर तू,


- स्थानिक भौगोलिक लक्षणे ओळखशील.
- आपला विभाग व तालुका ओळखशील

या चित्रांचे निरीक्षण कर. मागील इयत्तेत याबद्दल जाणून घेतले आहे ते आठव. यांची नावे खाली दिलेल्या चौकोनात लिही.











© KTBS NOT TO BE REPUBLISHED





मी कोण ?

मी रुंद आणि खोल आहे. माझे पाणी कपडे धुण्यासाठी, वाहने धुण्यासाठी आणि जनावरे धुण्यासाठी, तसेच शेतीसाठी आणि इतर काही कामासाठीही उपयोग करतात.

तर मी कोण ?



© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

तुमच्या गावात तळे असल्यास मोठ्या माणसाबरोबर जाऊन भेट दे. तेथे काय काम करतात. याचे निरीक्षण कर

तुमच्या गावातील तळ्यातील पाणी स्वच्छ आहे का ? निरीक्षण कर. हे पाणी स्वच्छ ठेवण्यासाठी काय करावे तू काय करशील ते सांग.

माझा रंग हिरवा आहे. अनेक जातीची झाडे माझ्यात आहेत. प्राणी, पक्षी माझ्यात राहतात. थंडगार हवा मी देतो.

तर मी कोण ? ☐



तुमच्या गावाजवळ जंगल असल्यास त्या ठिकाणी असणाऱ्या प्राणी पक्ष्यांबद्दल मोठ्याकडून समजून घे. जंगलातील झाडे झुडूपे तोडल्यास काय होते ? मित्रांशी चर्चा कर.

जिकडे पहावे तिकडे पाणीच पाणी. पण माझे पाणी खारट आहे. माझ्या किनाऱ्यावर वाळूच वाळू आहे. जहाजे माझ्यावरुन जातात. कोळी मासे पकडतात.

तर मी कोण ? ☐




@IBSS NOT TO BE REPUBLISHED

तुमच्या परिसराजवळ समुद्र असल्यास मोठ्यांच्या बरोबर जाऊन तेथील कामांचे निरीक्षण कर.

मी उंच आहे. माझ्यामध्ये काही ठिकाणी खडक असतात. झाडे झुडपे माझ्यावर वाढतात


तर मी कोण ? ☐




तुमच्या गावाजवळ टेकडी असल्यास मोठ्यांच्या सोबत अथवा मित्रांबरोबर फिरायला जा. तिच्या आकाराचे निरीक्षण कर. तेथे दिसणाऱ्या वस्तुंची यादी कर.

मी वाहते. माझे पाणी पिण्यासाठी आणि इतर कामासाठी वापरतात. काही वनस्पती माझ्या काठावर असतात, काही प्राणी माझ्यात राहतात.

तर मी कोण ?



ठिपके जोड व रंग भर



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

मला शोध.

या शब्दकोड्यात तुझ्या सभोवताली तू पाहिलेल्या व समजून घेतलेल्या काही नैसर्गिक वस्तू आहेत. त्या शोधून गोल कर. नंतर खाली दिलेल्या जागेत लिही. एक उदाहरण दिले आहे.

द्र	स	प	र्व	त	क्षी	प	वू
अ	ज	य	ई	र	ण	त	व
ब	टे	ड	ख	मी	न	दी	ख
क	क	म	जं	र	ज	ह	ळ
अ	डी	पा	ग	ड	त	ळे	गा
सा	ज	ट	ल	क्ष	ल	थ	म
फ	द	डों	ग	र	घ	ड.	च
झ	म	छ	ढ	ळ	झ	वि	को
स	मु	द्र	पि	ना	श	ती	र

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

उदाहरण :

समुद्र

1. .....
2. .....
3. .....
4. .....
5. .....

गा आणि आनंद लुटा

येरे दादा, ये ग ताई
गाव पाहून येऊ या
सभोवती जे जे आहे
पाहून समजून घेऊया


जंगल, टेकडी आणि पर्वत
फिरताना तेथे येते गंमत
प्राणी, पक्षी, वनस्पतींची
नावे समजून घेऊया

छोटा तलाव , वाहती नदी
मासे, खेकडे यात दिसती
समुद्र पहायला जाऊया
खूप मजा करुया.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुमच्या गावाजवळ पर्वत , टेकडी, तलाव, नदी आहे का ? असल्यास याबद्दल मित्र मैत्रिणींबरोबर चर्चा करुन समजून घे.

खालील चित्राचे निरीक्षण कर. आपल्या गावाचा परिचय करुन देत आहे.



→ हा माझा तालुका

→ हा माझा विभाग / मंडळ

→ हा माझा गाव

उत्तरे लिही.

* तुझ्या गावाचे नाव येथे लिही.

* तुझ्या गावाचा कोणत्या विभागात समावेश आहे. हे शिक्षकांकडून समजून घे व चौकोनात लिही.

* तुझ्या गावाचा कोणत्या तालुक्यात समावेश आहे हे वडिलधाऱ्यांच्या कडून समजून घे व लिही.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

गा आणि आनंद लुटा

गाव गाव माझा गाव
गाव गाव तुझा गाव
सांग तर मला तुझ्या गावाचे नाव ?
माझा गाव .....
तालुका तालुका माझा तालुका
तालुका तालुका तुझा तालुका
सांग तर मला तुझ्या तालुक्याचे नाव ?
माझा तालुका.....

वरील गाण्याप्रमाणेच इतर तालुके आणि जिल्हे याबद्दल गाणे तयार कर आणि मित्रांसोबत गा.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

